**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००**
**e-mail:-** msboardnagpur@gmail.com **www.nagpureduboard.in**

पत्र क्र. : नाविमं/प.उ.मा./१३७-A
नागपूर, दिनांक : १०/०१/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
नागपूर विभाग, नागपूर.
(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया)

विषय :– फेब्रु./मार्च–२०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत. (Hall Ticket)

संदर्भ :– राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क्र./परीक्षा–७/१२१, दिनांक ०९/०१/२०२५

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, फेब्रु./मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर Admission Card या Link द्वारे Downlode करण्याकरीता शुक्रवार दि. १० जानेवारी, २०२५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच ज्या आवेदनपत्रांना ''Paid '' असे Status प्राप्त झालेले आहे. त्यांचीच प्रवेशपत्रे '' Paid Status Admission Card '' या पर्यायाद्वारे उपलब्ध होतील.

सदर पत्राची प्रत जोडलेली आहेत तरी आपल्या अधिनस्त सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रवेशपत्र Downlode करण्यास काही तांत्रिक अडचन उद्‌भवल्यास विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा. No Candidate विद्यार्थ्याचे प्रवेशपत्र संबंधित विद्यार्थ्यास वितरीत करण्यात येवू नये याची नोंद घ्यावी.

सोबत – राज्य मंडळ पत्राची प्रत.

(चितांमण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रतिलिपी :–

१) सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना माहितीस्तव समादराने अग्रेषित.
२) मा. शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.
३) शिक्षणाधिकारी (माध्य.) सर्व जिल्हे (भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कार्यवाहीस्तव.

Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary
Education S.R.No.832-A, Final Plot
No. 178,179, Near Balchitrawani,
Behind Agharkar Research
Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए,
फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी
शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 |
Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे/महत्वाचे
परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/121
पुणे - ४११ ००४
दिनांक - ०9/०१/२०२५

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

विषय :- फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्रांबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी पात्र विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर शुक्रवार दि. १० जानेवारी, २०२५ पासून Admit Card या link व्दारे download करण्याकरिता उपलब्ध होतील.

१ फेब्रुवारी-मार्च २०२५ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२ प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांचा शिक्का मारून स्वाक्षरी करावी.

३ ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "Paid Status Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

४ अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

कृ.मा.प.....

५ Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख अशा दुरूस्त्या असल्यास सदर दुरूस्त्या Online पध्दतीने करावयाच्या असून त्याकरीता Application Correction ही Link उपलब्ध करून देण्यात आलेली असून विहित दुरूस्ती शुल्क भरून दुरूस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतेनंतर "Correction Admit Card " या Link व्दारे सुधारीत Admit Card उपलब्ध होतील. विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६ ज्या आवेदनपत्रांना "Paid " असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून "Late Paid Status Admit Card" या Option व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७ फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८ प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना प्रवेशपत्र download करण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास विभागीय मंडळाकडे संपर्क साधणेकरीता सूचित करावे व विभागीय मंडळांनी व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ यांचेशी पुढील कार्यवाहीसाठी संपर्क साधावा. No Candidate केलेल्या परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संबंधित विद्यार्थ्यांना वितरीत करू नयेत अशी स्पष्ट सूचना संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांना आपल्या स्तरावरून देण्यात यावी.

उपरोक्तनुसार आपल्या कार्यकक्षेतील सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच विद्यार्थी यांना सदर बाब अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(देविदास कुलाळ)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-४.

प्रत माहितीसाठी-

व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे-०४.